**रेग्युलर कज्जा क्रमांक १४१/२०१८.**

**निशाणी ३४ खालील आदेश.**

(CNR No.MHKO110011512018)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द प्रतिवादीने वादीचे दावा मिळकतीमध्ये केले अतिक्रमण काढून कब्जा मिळणेकरिता व कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. वादीचे म्हणण्यानुसार प्रतिवादी नं. १ ते ६ यांनी त्यांचे उत्तरेकडील ३७ आर ५० पॉईंट क्षेत्र उत्तर बाजुचे सावर्डे खोची रस्त्यालगत सोडुन प्रतिवादींचे क्षेत्रांचे दक्षिण बाजुस असणारे १ हेक्टर २० आर क्षेत्राचे मिळकतीमध्ये उत्तर बाजुने ७ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे वादी यांची दावा मिळकतीमधील कब्जा व वहिवाट तसेच प्रतिवादी यांचे कब्जेवहिवाट याची सविस्तर पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करणेकरिता म्हणून त्यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींनी न्यायालयीन आयुक्त अहवालास निशाणी ३६ ला त्याचे म्हणणे सादर करुन, अर्जातील मजकुराचा इन्कार केला आहे . तसेच प्रत्यक्ष वहिवाटीबाबत वादीने दावेमध्ये खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून काल्पनिक व रचनात्मक समजुतीचा नकाशा सादर करुन मे.कोर्टाची दिशाभुल केली आहे असे कथन केले आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. वादीचा दावा हा वादीचे दावा मिळकतीमध्ये केलेले अतिक्रमण काढून कब्जा मिळणेकरिता व कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी वर नमुद मिळकतीचे क्षेत्र खाजगी मोजणी करणार यांचेकडून मोजुन मापून दाखवले आहे परंतू प्रतिवादी सदरचे खाजगी मोजणीवरती विश्वास न ठेवता वादींचे क्षेत्र देणेस स्पष्टपणे नाकारात आहे. त्याकारणाने दावा मिळकतीची तसेच प्रतिवादींचे क्षेत्राची

मा.उपधिक्षक भुमिअभिलेख, हातकणंगले यांचेंमार्फत रितसर मोजणी होवून वादी प्रतिवादींचे ताब्यातील क्षेत्राचा नकाशा मे.कोर्टात येणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक व अगत्याचे आहे परंतू प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार सदरचा मजकुर चुकीचा व वस्तुस्थितीला अनुसरुन नाही. त्यामुळे त्यांनी वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. सदरच्या अर्जामध्ये वादी यांनी दावा मिळकतीबाबत कोर्ट कमिशनर नेमुन वस्तुस्थितीची पाहणी करणेबाबत विनंती केली आहे. एकंदरीत वादीचे कथन पाहता वादी प्रतिवादी यांच्यामधील वाद हा दावा मिळकतीमधील अतिक्रमणाबाबत असल्याचे दिसून येते. त्यामुळे दावा मिळकतीची हद्द वस्तुस्थिती एकत्रात पणे तज्ञ मोजणीदारा द्वारे मोजणी केलेशिवाय स्पष्ट होणार नाहीत. त्यामुळे विवेचना अंती आजमितीस तज्ञ मोजणीदार म्हणून उपअधिक्षक भुमी अभिलेख, हातकणंगले यांना या कामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करणे आवश्यक असलेचे या न्यायालयाचे मत आहे. सदर मोजणी करत असताना संबंधीत आयुक्त यांनी दावा मिळकतीच्या हद्दी पाहून तसा वस्तुस्थितीचा स्पष्ट अहवाल या न्यायालयात हजर करणे आवश्यक आहे. एकंदरित वरील चर्चेतुन आजमितीस न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करणेची आवश्यकता आहे या मतावर मी आलेले आहे . त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खालील अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. उपअधिक्षक, भुमिअभिलेख, हातकणंगले यांना याकामी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणेत येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी दावा मिळकत मौजे सावर्डे, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील भु.ग.क्र. ७७९ उत्तरेकडील ३७ आर ५० पॉईंट क्षेत्र उत्तर बाजुचे सावर्डे खोची रस्त्यालगत सोडुन प्रतिवादींचे क्षेत्रांचे दक्षिण बाजुस असणारे १ हेक्टर २० आर क्षेत्राचे मिळकतीमध्ये उत्तर बाजुने ७ आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले अथवा नाही याबाबतची सद्य परिस्थिती इ. वस्तुस्थितीचा अहवाल नियमाचे

पालन करुन हजर करावा.

४. वादी प्रतिवादी यांनी सदर न्यायालयीन आयुक्ताची फी निम्मी निम्मी भरावी.

५. वादी, प्रतिवादी यांनी दावा मिळकत भु.ग.क.७७९ चे मोजणी रिट बाबत सर्व कागदोपत्री पुर्तता ताबडतोब करावी व मोजणी कामी न्यायालयीनआयुक्तास सहकार्य करावे.

६. न्यायालयीन आयुक्त यांनी नियमाप्रमाणे आगावू नोटीसा बजावून आदेशाप्रमाणे मोजणी कामकाज पुर्ण करुन एका महिन्याचे आत अहवाल सादर करावा.

७. कमिशन पत्र त्वरीत पारीत करणेत यावे.

Pankaj Bhagatsingh Rajput

Digitally signed by Pankaj Bhagatsingh Rajput
Date: 2021.02.26 12:08:51 +0530

(श्रीमती पंकज बी.राजपुत),

दिनांक २५.०२.२०२१. दुसरे सह.दिवाणी न्यायाधिश क.स्तर

पेठवडगांव.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Smt.Pankaj B.Rajput, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon. |
| Date of Dictation | 25.2.2021 |
| Order signed by the P.O. on | 25.2.2021 |
| Order uploaded on | 26.2.2021 |